# सेवक वार्ता

डिसेंबर-२०२५

वर्ष -७ अंक- २

सेवानिवृत्त वनकर्मचारी संघ, महाराष्ट्र परिवाराचे विविध उपक्रम, विचारमंथन, घडामोडी, साहित्य याचे संवाद पत्र



## सेवकची वाटचाल ....

### "Treatise on Flowering of Bamboo" या पुस्तकाचे प्रकाशन व वितरण

**श्री. मो. ह. खेडकर, सेनि प्रमुवसं म. रा. यांनी लिखाण केलेल्या "Treatise on Flowering of Bamboo" या पुस्तकाच्या प्रकाशन व वितरण करण्यात आले आहे. केंद्रीय शाखेने सेवकच्या अमरावती, धुळे, चंद्रपूर, नागपूर शाखेस, या पुस्तकाच्या प्रत्येकी १० प्रती पाठविल्या आहेत. त्या, त्यांच्या वन वृत्तातील वनाधिकारी यांना भेट द्याव्यात, असेही कळविणेत आले आहे. वन वृत्तांनी आपली मागणी, संचालक, वन प्रबोधिनी, चंद्रपूर यांचेकडे नोंदवावी. त्यांचे मार्फत पुस्तके वाटप केली जातील. या पुस्तकांचा छपाई खर्च वन प्रबोधिनी, चंद्रपूर यांनी केला आहे.**

**या पुस्तकाचे देणगी मूल्य प्रती पुस्तक रू. २५/- आहे. ९०० पुस्तके वन प्रबोधीनीकडे आहेत. असे श्री. वि. त्र्यं. पत्की यांनी कळविले आहे.**

### सामाजिक वनीकरण शाखेच्या वनकट्टा या उपक्रमाच्या उद्‌घाटनपर व्याख्यानास सेवानिवृत्त वन अधिका-यांची लक्षणीय उपस्थिती




**पुणे, दि.** ८-१२-२०२५ : एम्प्रेस गार्डन येथे आयोजित वनकट्टा येथे डॉ. ई. भरुचा, यांचे "भारत/पश्चिम घाटातील पवित्र ग्रोव्हजचे पर्यावरणीय/सामाजिक महत्त्व" या विषयावर भाषण आयोजित करण्यात आले होते. त्यास खालील सेवानिवृत्त वन अधिकारी उपस्थित होते. व्ही. टी. पत्की, उमेश अग्रवाल, डॉ. अरविंद झा, डॉ. एस. एच. पाटील, अरविंद आपटे, पी. जे. लोणकर, विठ्ठल धोकटे, सुभाष बडवे, जे. पी. त्रिपाठी.

तसेच पंकज गर्ग, उवसं, सा.व.वि.पुणे, श्रीमती आशा भोंग, विवअ, सा.व.वि. (मुख्यालय) पुणे व काही इतर स्थानिक अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

दीपक पवार, सवसं यांनी कार्यक्रमाचे संचालन केले.

कु. श्रावणी पत्की यांनीही तेथे हजेरी लावली आणि सादरीकरणाने प्रभावित झाल्या.



**महाराष्ट्र बांबू उद्योग धोरण - २०२५ बाबत.**

**मंत्री मंडळाच्या १४ ऑक्टोबर,२०२५ रोजीच्या बैठकीत महाराष्ट्र बांबू उद्योग धोरण - २०२५ यांस मान्यता देण्यात आली.**

**राज्यात मोठ्या प्रमाणावर लागवड होणा-या बांबूला बाजारपेठ उपलब्ध होणे करीता राज्यातील बांबूवर राज्यातच प्रक्रीया होऊन मूल्यवर्धित उत्पादनांसाठी एक मजबूत मूल्य साखळी विकसित करणे आवश्यक आहे. बांबू लागवड आणि प्रक्रिया क्षेत्रात संशोधन आणि विकासाला पाठिंबा देऊन नाविन्यपूर्ण बांबू उत्पादने तयार करण्यासाठी आणि राज्यातील बांबूच्या कच्चा मालाची आयात कमी करुन बांबूपासून बनवलेल्या उच्च दर्जाच्या मुल्यवर्धीत बांबू उत्पादनांच्या निर्यातीला प्रोत्साहन देण्यासाठी धोरणाची आवश्यकता होती.**

**या सर्व बाबींचा सर्वांगीण विचार करून राज्य शासनाने दिनांक १४ ऑक्टोबर, २०२५ रोजी झालेल्या मंत्रीमंडळ बैठकीत महाराष्ट्राचे बांबू उद्योग धोरण-२०२५ यांस मान्यता दिली आहे.**

महाराष्ट्राचे बांबू उद्योग धोरण-२०२५ चे मुख्य वैशिठ्ये खालीलप्रमाणे आहेत.

- निर्यातीद्वारे जागतिक बाजारपेठेत महाराष्ट्राची उपस्थिती वाढविण्यासाठी आणि आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी बांबूवर आधारीत उद्योगांमध्ये पुढील २० वर्षात या धोरणामुळे ₹. ५०,००० कोटींपेक्षा जास्त गुंतवणूक आकर्षित करणे शक्य होणार.
- धोरण कालावधीत राज्यात सुमारे ५,००,००० प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार निर्माण होईल.
- महाराष्ट्र व्हिजन २०३० शी सुसंगत अशी शाश्वतता, चक्रकारता आणि अक्षय ऊजेला प्रोत्साहन देणे ही लक्षे साध्य करण्यास होणार आहे.
- पर्यायी ऊजा स्रोत म्हणून बांबूचा वापर करता येईल आणि कोळशाच्या वापराच्या ५-७ % वापर बांबूच्या जैव इंधनाने बदलण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे.
- बांबूच्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध व्हावी यासाठी पणन विभागाच्या सहाय्याने नविन बाजारपेठा तयार करणार आणि सध्या आ स्तित्वात असलेल्या बाजारपेठा अधिक सक्षम व कार्यक्षम करण्यात येणार.
- महाराष्ट्रातील धोरणात्मक रित्या निवडलेल्या प्रदेशांमध्ये १५ तसेच आवश्यकतेनुसार अतिरिक्त समर्पित बांबू प्रक्रिया आणि उत्पादन क्लस्टर स्थापन करता येतील.
- कार्बन क्रेडिट मार्केट स्थापन करून बांबूच्या कार्बन जप्तीच्या क्षमतेचा फायदा घेणे, बांबू-आधारित कार्बन कमी करण्याच्या उपक्रमांद्वारे मिळवलेल्या क्रेडिटचा व्यापार सक्षम करणे, ही उद्दीष्टे पुर्ण करण्यास मदत होईल.त्याचप्रमाणे महाराष्ट्र बांबू उद्योग धोरणांतर्गत पात्र उद्योग घटकांसाठी खालील प्रोत्साहने दिली जातील.
- पात्र उद्योग घटकांना १० वर्षाच्या कालावधीसाठी महाराष्ट्रात केल्या जाणा-या वार्षिक विक्रीवरील एकूण SGST च्या १००% औद्योगिक प्रोत्साहन अनुदान मंजूर केले जाईल.
- पात्र उद्योग घटकांसाठी स्थिर भांडवली गुंतवणुकीतील प्लँट व यंत्र सामग्रीच्या २०% पर्यंत भांडवली अनुदान दिले जाईल.
- पात्र उद्योग घटकांना खालील तक्त्यानुसार, त्याच्या वाढीव विक्रीच्या ५ टक्केपयंत वार्षिक प्रोत्साहन (PLI) ५ वर्षांसाठी अनुज्ञेय राहील.
- पात्र मुदत कर्जांवर कमाल ५% पर्यंत व्याज अनुदान देय असेल.
- राज्यातील पात्र नवीन उद्योग घटक आणि विद्यमान उद्योग घटकांच्या विस्तारीकरण/व्याप्ती वाढविण्यासाठी प्रचलित महाराष्ट्र औद्योगिक धोरणानुसार मुद्रांक शुल्क सवलत मिळेल.
- पात्र नवीन उद्योग घटकांना प्रचलित महाराष्ट्र औद्योगिक धोरणानुसार सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम आणि मोठ्या उद्योग घटकासाठी ५ वर्ष आणि विशाल व अतिविशाल उद्योग घटकांसाठी १० वर्ष वीज शुल्क भरण्यापासून सूट दिली जाईल.
- पात्र नवीन उद्योग घटकांसाठी व्यावसायिक उत्पादन सुरू झाल्यापासून ५ वर्षांसाठी वापरल्या जाणाऱ्या प्रति युनिट उर्जेसाठी ₹ १/- याप्रमाणे वीज दर अनुदान दिले जाईल.
- धोरण कालावधीत पहिल्या ५० संस्थाना कमाल ₹.५ कोटी रुपयांच्या मर्यादेपर्यंत तंत्रज्ञानातील गुंतवणुकीच्या २५% रक्कम एक वेळ प्रोत्साहन म्हणून परत फेड केले जाईल.
- धोरण कालावधीत १० नवीन ऊती संवर्धन प्रयोगशाळा आणि संशोधन आणि विकास घटक स्थापन करण्यासाठी कमाल ₹२ कोटी रुपयांच्या मर्यादेपर्यंत ५०% अनुदान देय असेल.
- राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील इतर प्रतिष्ठित संस्थाद्वारे प्रायोजित केलेल्या अथवा आयोजित केलेल्या प्रशिक्षणासाठी पात्र बांबू उद्योग घटकांना आणि स्टार्टअप्सना धोरण कालावधीत राष्ट्रीय स्थरावर प्रति युनिट कमाल १ लाख रुपये आणि आंतरराष्ट्रीय स्थरावर प्रति युनिट कमाल ₹ ३ लाख रुपयांच्या मर्यादेत ५०% प्रदर्शन सहभाग शुल्क (जागा खर्च/भाडे) परतफेड केली जाईल.
- ह्या व्यतिरिक्त, अतिविशाल आणि अँकर उद्योग घटकांना विशेष प्रोत्साहन पॅकेज देता येऊ शकेल.

महाराष्ट्र बांबू उद्योग धोरण -२०२५ अंतर्गत ५ वर्षांच्या धोरण कालावधीमध्ये (सन २०२५-२०३०) राज्य शासनाकडून द्यावयाच्या विविध औद्योगिक प्रोत्साहनांकरीता, अनुदानासाठी आणि धोरणातील तरतूदी राबविण्याकरीता सुमारे ₹ १५३४ कोटी इतकी आर्थिक तरतूद करण्यात येईल. सदर धोरणांतर्गत एकूण २० वर्षांच्या कालावधीत द्यावयाच्या विविध अनुदानांसाठी आणि धोरणातील तरतूद राबविण्याकरीता एकूण ₹ ११७९७ कोटी इतकी आर्थिक तरतूद करण्यात येणार आहे. तसेच बांबू क्षेत्रातील नवोपक्रम आणि उद्योजकतेला प्रोत्साहन देण्यासाठी, राज्य शासन ₹ ३०० कोटी रुपयांच्या निधीसह एक समर्पित व्हेंचर कॅपिटल फंड उभारण्यात येईल.

धोरण कालावधीमध्ये (सन २०२५-२०३०) बाांबू उद्योग व त्याचे परिसंस्थेच्या माध्यमातून ₹.१६२९ कोटी आणि एकूण २० वर्षांच्या कालावधीत ₹ २१५९० कोटी इतका महसूल राज्य शासनाला उपलब्ध होऊ शकेल. तसेच राज्यातील ५ लाख लोकांसाठी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार निर्माण होऊ शकेल.

## मुख्यमंत्री वन व पर्यावरण संवर्धन योजना, २०२५

राष्ट्रीय उद्याने, अभयारण्ये व संवर्धन क्षेत्रे अशा संरक्षित क्षेत्रांद्वारे राज्याच्या एकूण भौगोलिक क्षेत्राच्या जास्तीत जास्त टक्के क्षेत्र वनाच्छादित करण्यासाठी राज्य शासनाकडून प्रयत्न केले जात आहेत. विकसित भारतासोबत विकसित महाराष्ट्राची संकल्पना राबवितांना राज्यात मोठ्या प्रमाणात पायाभूत सुविधेची कामे हाती घेण्यात आली आहेत. एकंदरित राज्याच्या वाढत्या लोकसंख्येमुळे व विविध विकास कामांमुळे वन व पर्यावरणावर विपरीत आघात होत आहे. राज्यात विविध प्रकल्पांकरिता विशेषतः गौण व प्रमुख खनिजांची वाढती गरज लक्षात घेता मोठ्या प्रमाणात वनक्षेत्र व वन्यजीव तसेच पर्यावरणाचे होणारे नुकसान टाळण्यासाठी पर्यावरणाचे संरक्षण करणे हे अत्यंत गरजेचे आहे. एकीकडे विविध औष्णिक वीज प्रकल्प, औद्योगिकीकरण हे सातत्याने वाढत असल्याने कार्बन उत्सर्जनामुळे Global Warming चे संकट ओढावलेले आहे. तर दुसरीकडे पॅरिस येथे झालेल्या करारानुसार कार्बन उत्सर्जन कालबध्द पध्दतीने कमी करावयाचे आहे. उपरोक्त परिस्थिती विचारात येता विकासचक्रासोबत पर्यावरणाचा विनाश टाळण्यासाठी राज्य शासनाचा एक नवीन धोरण निश्चित करण्याची नितांत आवश्यकता आहे.

भारतीय संविधानाच्या भाग-४ अनुच्छेद ३६-५१ मध्ये राज्याच्या धोरणासंबंधी मार्गदर्शक तत्वे विहीत केली आहे. अनुच्छेद ४६ मध्ये अनुसुचित जाती, जमाती व इतर दुर्बल घटकांच्या आर्थिक हितसंबंधाचे उत्थान करणे तसेच अनुच्छेद ४८-क मध्ये वन व वन्य जीवांचे व पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करणे हे राज्याचे कर्तव्य असल्याबाबत तरतुद आहे. सदर तरतुदी विचारात घेता, राज्याने वन, वन्यजीव, पर्यावरण व वनालगतचे मानवी जीवन यांच्या उत्थानासाठी आवश्यक त्या उपाययोजना करणे क्रमप्राप्त ठरते.

मागील काही वर्षामध्ये व्याघ्रसंवर्धनाच्या उपाययोजना राबविल्यामुळे गावांची संख्या वाढली आहे. तसेच बिबट व इतर वन्यप्राण्यांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. त्यामुळे एकूण उपलब्ध वनक्षेत्र वन्यजीवांच्या अधिवासासाठी अपुरे पडत आहे. परिणामी वनालगतच्या क्षेत्रातील खाजगी शेतजमिनी, कुरणे व मानवी वस्ती यांमध्ये तृणभक्षक तसेच मांसभक्षक वन्यजीवांचा

या क्षेत्रामध्ये वावर वाढला आहे. वन्यप्राण्यांमुळे शेतपीकांचे नुकसान होत आहे. मानववावर वन्य प्राण्यांच्या हल्ल्यांचे प्रमाण वाढल्यामुळे एकीकडे मोठ्या प्रमाणात मानवी जीवित हानी सातत्याने वाढत आहे, तर दुसरीकडे वन्यजीव हल्ल्यात बाधित शेतक-यांच्या संख्येत व अनुज्ञेय नुकसान भरपाई रकमेत (Compensation) वाढ मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. याचा मोठ्या प्रमाणावर आर्थिक भार शासन तिजोरीवर पडत आहे. तसेच नुकसान भरपाई रक्कम विहीत वेळेत देण्याबाबत राज्य शासनाने कायदा देखील पारित केला आहे. परंतु, या सर्व उपाययोजना ह्या मानव व त्यांचे कृषी पूरक जीवन यांना नुकसान/ हानी झाल्यानंतर करण्यात येतात. परंतु, असे नुकसान होऊ नये म्हणून प्रतिबंधात्मक उपाय / योजना आखणे काळानुसार आवश्यक ठरले आहे.

एकीकडे राज्यात विविध पिकांच्या उत्पादनात लक्षणीय वाढ झाली असून कृषी क्षेत्रात पीक उत्पादनात महाराष्ट्राने फार प्रगती केली आहे. परंतु काही पिकांच्या उत्पादनामुळे राज्याच्या अर्थव्यवस्थेला मोठी मदत होते. विशेषतः जे उत्पादन इतर देशात निर्यात होतात किंवा ज्या पिकांची गरज आहे ते उत्पादन केल्यास राज्याच्या शेतकऱ्यांना योग्य भावही मिळतो व त्यातून राज्याच्या अर्थव्यवस्थेला गती प्राप्त होते. तर दुसरीकडे काही पिकांच्या उत्पादनामुळे राज्यावर दायित्व निर्माण होते. जी पिके राज्याच्या अर्थव्यवस्थेच्या हितासाठी व शेतकर्याच्या जास्त फायद्याची आहे त्या पिकांना प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. परंतु ज्या पिकांच्या उत्पादनामुळे उत्पादित पिकाला भावही देता येत नाही व त्याला खरेदी करण्याचे दायित्व शासनावर निर्माण होते. ते खरेदी केल्याने त्यात शासनाला निधी गुंतवावा लागतो तर दुसरीकडे ते साठविण्यासाठी गोदामाचे भाडे व त्या उत्पादित शेतमालाचा योग्य वापर करण्याबाबत प्रश्न उपस्थित होतो. अशी पिके घेणाऱ्या शेतकऱ्यांना Crop Diversion करून इतर पिके लावण्यासाठी प्रोत्साहित करणे व त्यातुन ज्या उत्पादनांची गरज आहे व ज्या उत्पादनांमुळे राज्याची व देशाची गरज पूर्ण होईल व त्यातुन राज्याला व देशाला आत्मनिर्भर करण्यास मदत होईल अशी पिके लागवडीकरिता प्रोत्साहन धोरण करणे हेदेखील नितांत गरजेचे आहे.

राज्याला आत्मनिर्भर करण्यासाठी व उत्पादित पिकातून Global Warming सारख्या आव्हानाचा सामना करता येईल व त्यावर उपाययोजना करता येईल. सोबतच केंद्र शासनाचा जास्तीत जास्त निधी वापरून राज्याच्या निधीची बचतही करता येईल. तसेच मोठ्या प्रमाणामध्ये फळ पिकांची लागवड करून हरित आच्छादन निर्माण करता येईल व त्यातुन राज्याच्या एकूण क्षेत्रफळाच्या किमान ३३ टक्के क्षेत्र हे हरित आच्छादनाने वाढवून त्यातुन वातावरणाचे तापमान काही अंशाने कमी करणे सोबत निसर्गाचे रक्षणही करणे हे आता अत्यंत गरजेचे झाले आहे. शेतीतून उत्पादित प्रत्येक उत्पादन हे राज्याच्या अर्थचक्राला गती देणाराच असावा व त्यातून शेतकयांचे हित साध्य होईल हे उद्दिष्ट समोर ठेऊन त्यातुन राज्याचेही हित साध्य व्हावे हे दृष्टीकोन ठेऊन Per drop more crop च्या पुढे आता per crop will increase economic graph हे उद्दिष्ट कृतीत आणणे हे नियोजनदेखील करणे गरजेचे आहे.

एकंदरीत राज्यात कुठले उत्पादन घ्यावे हे जास्त फायद्याचे आहे, विकेल ते पिकेल, मागणीनुसार पुरवठा हे लक्षात घेता शेतकऱ्यांनी त्यांच्या जमीनी भौगोलिक परिस्थिती, माती परीक्षण, हवामान व वातावरणाचा अंदाज, पाण्याची उपलब्धता इत्यादी बाबींचा विचार करून कुठली पिके घ्यावी याबाबत नियोजन हे कृषी विभागामार्फत करणे आवश्यक असल्याने याबाबतची प्राधान्य यादी प्रसिध्द करावी.

शेतकयांनी उभी केलेली पीके ज्याला नैसर्गिक आपत्तीला सामोरे जावे लागते व नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकयांचे न भरून निघणारे नुकसान होते व शासनाकडून मिळालेल्या नुकसान भरपाईतूनही त्याची भरपावती होत नाही. अश्या पिकांना नुकसान भरपाई दिल्याने शासनावरही दायित्व निर्माण होतो त्या पैशातून शेतीचा विकास व भांडवली गुंतवणूक करण्याचे शासनाच्या उद्देशाला बाधा निर्माण होते व शेतक-यालाही पुरेसा आधार मिळत नाही व तो समाधानी व आत्मनिर्भर होत नाही व त्याने उत्पादित केलेल्या मालाला भाव नाही म्हणून आर्थिकदृष्ट्या शेतकरी आत्मनिर्भर व समृध्द होत नाही व शासनावरही दायित्व निर्माण होते. त्याऐवजी ज्या पिकांना अतिवृष्टी, गारपीट, अवेळी व अवकाळी पाऊस, दुष्काळ व इतर नैसर्गिक आपत्तीमुळे बाधा होणार नाही अशी चारा, बांबू, सागवन, मोहगनी व Agro Forestry अंतर्गत येणारी विविध प्रजातीची झाडे ज्यामुळे शेतक-यांचेही उत्पन्न वाढेल, Bio-Diesel, Ethenal, Methenal, Bio Mask औषधी वनस्पती, लाकुडसारखे उत्पादन घेऊन शेतक-यांचे उत्पन्न वाढविणे, जमीनीची सुपीकता वाढविणे, पर्यावरणाचे रक्षण करणे, जंगलतोड कमी करणे, नैसर्गिक आपत्तीचा धोका कमी करणे, पावसाचे पाणी जमीनीत मुरण्यास मदत करणे जमीनीची धूप कमी करणे, आत्मनिर्भर भारत आत्मनिर्भर महाराष्ट्र सोबत आत्मनिर्भर जिल्हा व आत्मनिर्भर शेतकरी यासारखे उद्देश्य पूर्ण करता येईल यादृष्टीनेही नियोजन करणे अत्यंत गरजेचे आहे.

प्रत्येक माणसाने केलेले श्रम व वापरलेले मनुष्यदिवस हे राज्याच्या व देशाच्या हिताचे व प्रगतीच्या दिशेने नेणारे असावे, अन्यथा हे श्रम व मनुष्यदिवस निष्फळ ठरतात. आपले परिश्रम व कृती ही राज्याच्या हिताची आहे किंवा नाही याचा ज्ञान व भानही त्या व्यक्तीला राहत नाही. त्यामुळे "माझे प्रत्येक क्षण व श्रम राज्य आणि देशाला आत्मनिर्भरता व समृध्दीकडे नेणारा" असा दृष्टीकोन ठेऊन तशी व्युवरचना करून त्या दिशेने पाऊल उचलण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे हेदेखील लोकांच्या समोर मांडणे अत्यंत गरजेचे आहे.

तसेच राखीव व्याघ्र संवर्धन क्षेत्रांचा विचार करता (Tiger Conservation reserve/ Corridor) अशा क्षेत्रांमध्ये सलगता नाही. जेव्हा एका क्षेत्रातील वाघांची संख्या वाढते, तेव्हा त्या क्षेत्रातील काही वाघ ते क्षेत्र सोडून इतर क्षेत्राकडे भ्रमण करुन नवीन क्षेत्र शोधतात, असे भ्रमणमार्गही सुरक्षित झाल्यास वन, मानव व वन्यजीव व पर्यावरण यांना पूरक ठरणार आहे.

त्यासाठी वनांलगतचे क्षेत्र, व्याघ्रभ्रमणमार्गातील क्षेत्र यांवर चांगले वन विकसित करणे व अशा क्षेत्रांमध्ये निसर्ग पर्यटनासारख्या उपक्रमांना चालना देवून स्थानिक लोकांना रोजगार निर्माण करण्यासाठी धोरण तयार करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

त्याअनुषंगाने खालीलप्रमाणे धोरण प्रस्तावित करण्यात येत आहे:-

धोरणाची उद्दिष्टे :-

- वनालगतच्या क्षेत्राचे तसेच व्याघ्रभ्रमण मार्ग क्षेत्राचे सर्वेक्षण करुन ते क्षेत्र संवर्धन करणे व ते क्षेत्र चिन्हांकित करणे.
- सर्वेक्षणानुसार चिन्हांकित केलेल्या क्षेत्राचे खाजगी व शासकीय क्षेत्र असे वर्गीकरण करुन त्याची यादी तयार करणे.
- चिन्हांकित क्षेत्रात आवश्यकतेनुसार निश्चित करुन संपूर्ण क्षेत्रात उच्च प्रतीचे वनक्षेत्र निर्माण करणे.
- या वनक्षेत्र परिसरात Public Private Partnership (PPP) तत्वावर वन संवर्धन व वन पर्यटनास चालना देणे.

धोरण :-

उपरोक्त क्षेत्रात उच्च प्रतीचे वनक्षेत्र तयार करुन त्या क्षेत्रामध्ये पर्यटनास चालना देण्यासाठी खालीलप्रमाणे धोरण तयार करण्यात येत आहे:

१. वनालगतच्या क्षेत्राचे तसेच व्याघ्र भ्रमण मार्ग क्षेत्राचे सर्वेक्षण करुन ते क्षेत्र निश्चित करणे व त्या क्षेत्राचे संवर्धन करणे.

महाराष्ट्रातील संरक्षीत वनक्षेत्रात तृणभक्षक व मांसभक्षक प्राण्यांची संख्या दिवसागणीक वाढल्याने हे प्राणी वनालगतचया आजुबाजूच्या परिसरात वावरू लागले आहेत. त्यामुळे शेत जमीनीवरील पिकांचे नुकसान होते तसेच मानवी वस्त्यांवर घूसून मानवांवर वन्य प्राण्यांच्या हल्याचे प्रमाण वाढले आहे. हा मानव व वन्यजीव यांच्यातील संघर्ष कमी करण्याच्या दृष्टीने संरक्षीत वनालगत वन्य प्राण्यांच्या प्रादुर्भावामुळे बाधीत होणाऱ्या क्षेत्राचे वनविभाग, महसूल, कृषी आणि भूमी अभिलेख या विभागांमार्फत संयुक्त सर्वेक्षण करण्यात यावे. असे सर्वेक्षण करुन सदर क्षेत्राचा नकाशा तयार करावा आणि सदरचे क्षेत्र चिन्हाकीत करण्यात पाये. (Earmark).

२. सर्वेक्षण केलेल्या क्षेत्राचे वर्गीकरण करण्यात यावे,

विविध विभागाच्या संयुक्त सर्वेक्षणाव्दारे चिन्हांकित क्षेत्रात वनक्षेत्र, शासनाचे गायरान क्षेत्र, शासकीय जमीन, खाजगी लागवडीखालील जमीन तसेच खानगी पडीक जमीन क्षेत्राचा समावेश असू शकतो असे वर्गीकरण केल्यामुळे त्या क्षेत्रावरुन वनक्षेत्र विकसीत करण्याच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करणे सुलभ होईल.

३. वर्गीकृत क्षेत्रापैकी विविध शासकीय जमीनीवर कुरण विकास स्थानिक प्रजातीच्या वृक्षांची

लागवड इत्यादी प्रकारे उच्च दर्जाचे वनक्षेत्र निर्माण करणे.

संयुक्त सर्वेक्षणातून समोर आलेल्या शासकीय जमिनी उदा., वनजमीन, शासकीय जमीन (महसुली), गायरान जमीन इत्यादी क्षेत्रावर वन विभाग, सामाजिक वनीकरण, रोजगार हमी योजना यांच्या मार्फत मोठया प्रमाणात कुरण विकास तसेच स्थानिक प्रगतीच्या वृक्षाची लागवड करुन उच्च वनक्षेत्र निर्माण करण्यासाठी वन विभागाच्या CAMPA सारख्या योजना मधून निधी उपलब्ध करावा. अशा क्षेत्रात तृणभक्षक प्राण्यांना खाद्य उपलब्ध झाल्यास अशा तृणभक्षक प्राण्यांचे शेती जमिनीवरील पिकांवरील हल्ले कमी होतील, तसेच या भागात तृणभक्षक प्राण्यांची संख्या वाढल्यामुळे मांसभक्षक प्राण्यांचे मानवी वस्त्यांवरील हल्ले कमी होतील .

४. चिन्हांकित क्षेत्रात येणा-या खाजगी जमिनीवर उच्चदर्जाच्या वन क्षेत्र विकसीत करण्यासाठी

अधिग्रहण करणे

४.१ संयुक्त सर्वेक्षणात व चिन्हांकित क्षेत्रात येणा-या खाजगी जमिनीवर सुद्धा वन विकास करणे आवश्यक आहे. अशा लागवडीखालील/पडीक शेत जमीनीवर शेतपिकांची लागवड केल्यास वन्यप्राण्यांमार्फत नुकसान होते तसेच या क्षेत्रात शेतात काम करणा-या मानवांवर हल्ले होतात. त्यामुळे असे हल्ले व नुकसान टाळण्यासाठी हे खाजगी क्षेत्र वन विकास करण्यासाठी अधिग्रहित करणे आवश्यक आहे.जे शेतकरी / जमीन मालक स्वत:हून या चिन्हांकित क्षेत्रातील जमीनी शासनास देण्यास तयार असतील जमिनीचे अधिग्रहण थेट वाटाघाटीव्दारे भूसंपादन अधिनियम २०१३ नुसार करण्यात यावे.

४.२ जे शेतमालक स्वत:हून जमीनी देण्यास तयार नसतील अशा जमीनी मालकाकडून दिर्घकालीन मुदतीसाठी भाडेतत्वावर देण्याची योजना तयार करण्यात यावी.

४.३ अशा जमीनी कमीत कमी ३० वर्षे एव्हढ्या कालावधीसाठी वार्षिक ठराविक दराने भाडेकरारावर

घेण्यात याव्यात. असा भाडेकरारावर घेतलेल्या जमिनीवरसुद्धा वर नमुद केल्याप्रमाणे उच्च प्रतिचे वन, कुरण विकास कार्यक्रम वन विभागामार्फत राबविण्यात यावा.

५. वनालगत तयार केलेल्या वनक्षेत्रात निसर्ग पर्यटन, वन पर्यटनाच्या सुविधा निर्माण करणे.

महाराष्ट्रातील अभयारण्य, संरक्षित राखीव क्षेत्रे इत्यादी मध्ये वनपर्यटन, जंगल सफारी सारख्या सुविधा वन विभागामार्फत निर्माण केलेल्या आहेत. अशा वनपर्यटनाकडे मोठ्या प्रमाणात राज्यातील / देशाबाहेरील पर्यटक आकर्षीत होत आहे. परंतु, या पर्यटनावर वन्यजीव सुरक्षा अधिनियमानुसार अनेक बंधने येतात. त्यामुळे पर्यटकांकडून मोठया प्रमाणात मागणी असूनही अशा सुविधा वन विभागाव्दारा उपलब्ध करुन देऊ शकत नाही. तसेच या वनालगतच्या बफर झोन क्षेत्रात ही अलीकडच्या काळात खाजगी व्यवसायिकाकडून पर्यटनाच्या सुविधा निर्माण करण्याचे प्रयत्न झाले आहेत. पर्यटकांच्या मागणीच्या संधी समजून या धोरणाच्या माध्यमातून चिन्हांकित केलेल्या क्षेत्रावर वन क्षेत्र विकसित झाल्यावर अशा कृत्रिमरित्या तयार झालेल्या वनक्षेत्रात कोणाचाही निर्बंध विरहीत पर्यटन व्यवसाय निर्माण करण्यात यावा त्यासाठी Public Private Partnership च्या धरतीवर हे पर्यटन विकसीत करण्यत यावे. चिन्हांकीत करुन तयार झालेल्या वनक्षेत्राचे दहा हेक्टर ते शंभर हेक्टर असे कंपार्टमेंट करुन ही कंम्पार्टमेंट पर्यटनांच्या सुविधा निर्माण करण्याची मुभा खाजगी व्यवसायीकांना द्यावी. अशा क्षेत्रासाठीचा भाडेपट्टा कराराव्दारे मिळणारी रक्कम मुळ शेत जमीन मालकास देण्यात यावी. तसेच या क्षेत्रात निर्माण होणाऱ्या रोजगाराच्या संधीमध्ये स्थानिकांना प्राधान्या देण्यात यावे, या क्षेत्रात विकसीत केलेल्या वनक्षेत्राच्या प्रती दहा हेक्टर क्षेत्रामागे एक कक्ष व हॉटेल सुविधा या प्रमाणात निवास सुविधा निर्माण करण्याची मुभा खाजगी व्यवसायिकाला दयावी. या क्षेत्रात जंगल सफारी सारखे पर्यटन सुविधा खाजगी व्यवसायिकामार्फत निर्माण करण्यात याव्यात तथापी त्यावर वन विभागाचे नियंत्रण असावे मा संदर्भातील नियमावली स्वतंत्रपणे तयार करण्यात यावी

Land Bank-

६.१ या धोरणानुसार चिन्हांकित केलेल्या क्षेतील जमीनीचा वन विभागाची लॅन्ड बैंक म्हणून वापर करण्यात यावा व अशा जमिनींचा विनियोग वन संवर्धन कायदा १९८० मधील तरतुदी नुसार पर्यायी वनीकरण जमीन म्हणून घेणे संबंधित प्रकल्प यंत्रांना बंधनकारक करण्यात यावे.

६.२ त्रिपक्षीय कराराव्दारे वनीकरण महाराष्ट्रात कार्यरत असणाऱ्या ब-याचशा कंपन्या व उद्योग यांचा सिएसआर निधी वन संवर्धन क्षेत्रासाठी / वनीकरणासाठी वापरु इच्छित असतात. त्यांच्या मागणीनुसार वन विभागामार्फत त्रिपक्षीय कराराव्दारे वनीकरणाचा कार्यक्रम राबविण्यात येतो. अशा प्रकारे राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमांसाठी प्राधान्याने चिन्हांकित जमीनीची निवड करण्यात यावी

७. योजनचे वित्तीय व्यवस्थापन:

७.१ आवश्यकतेनुसार खाजगी मालकी जमिनीचे अधिग्रहण अथवा दिर्घकालीन भाडेपट्ट्याने ताब्यात

घेणे, ही कार्यवाही वन विभागामार्फत करण्यात यावी व सदर खाजगी जमीन मालकांना त्याबाबतचा मोबदला वन विभागाने द्यावा.

७.२ या सर्व क्षेत्रावर उच्च प्रतीचे कुरण विकास वनाच्छादन करणे यासाठीचा खर्च वन विभागाने करावा

७.३ असे विकसित झालेले वनक्षेत्र दिर्घ कालावधीसाठी भाडेपट्ट्याने खाजगी विकासकांना विहीत

निविदा प्रक्रीया राबवून देणे व त्यासाठीचा वार्षिक मोबदला राज्याच्या एकत्रित निधीमध्ये जमा करण्यात यावा.

८. अंमलबजावणी यंत्रणाः-

या योजनेची अंमलबजावणीखालील समितीकडून करण्यात यावी

१. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) - अध्यक्ष

२. संबंधित अधिकार क्षेत्रातील पर्यटन विभागातील अधिकारी - सदस्य

३. संबंधित उपविभागीय अधिकारी (महसुल विभाग) - सदस्य
४. संबंधित अधिकार क्षेत्रातील उप वन संरक्षक / विभागीय वनधिकारी- सदस्य सचिव
सदर योजनेनुसार सदस्य सचिव प्रस्ताव तयार करून समितीच्या शिफारशीने व कॅम्पाकडे निधी मागणीकरीता सादर करतील
९. सदर योजना कार्यान्वित करण्यासाठीचे आर्थिक स्वोत
वनाच्छादन निर्माण करण्यासाठीचा मुख्य आर्थिक स्त्रोत कॅम्पा राहील व अन्य स्त्रोतामार्फत ही निधी उपलब्ध करता येऊ शकेल जसे- राज्य योजना, जिल्हा नियोजन समिती, कंपनी सामाजिक उत्तरदायित्व व त्रिपक्षीय कराराब्दारे मिळणारा निधी, SBWL कडे निधी प्रकल्पयंत्रणांमार्फत जमा होणारा ४ टक्के निधी.
१०. निसर्ग पर्यटनबाबीच्या सुविधांची निर्मिती व देखभाल
चिन्हांकित क्षेत्रात तयार झालेले वनाच्छादित क्षेत्र निसर्ग पर्यटनाच्या सुविधा निर्माण करणे, देखभाल करणे व असे यूनिट चालविणे यासाठी Public Private Partnership तत्त्वावर खाजगी विकासकांना देण्यात याव्यात यासाठी उपलब्ध वनाच्छादित क्षेत्रांचे कम्पार्टमेंट विहित निविदा प्रक्रिया राबवून दीर्घकाळासाठी तीस वर्षे कालावधी खाजगी विकासकांना देण्यात याव्यात या क्षेत्रावरील नियंत्रणासाठी स्वतंत्ररीत्या नियमावली निर्गमित करण्यात यावी
पर्याय

१. स्वतः शेती करण्यास इच्छुक शेतकरी - अशा विपरीत परिस्थितीतही शेती करण्यास इच्छुक शेतकऱ्यांना कुंपण, पॉलिहाऊस, ग्रीन हाऊस, संरक्षित शेती व शाश्वत शेतीसाठी सर्वतोपरी मदत कृषी विभागामार्फत करण्यात येईल. अशा शेतकऱ्यांनी कुठली पिके घ्यावी, याबद्दल त्यांना मुभा असेल. परंतु अशा शेतकऱ्यांनी कुठली पिके घ्यावी याबाबत त्यांना कृषी विभागामार्फत समुपदेशन व मार्गदर्शन करण्यात येईल

२. शेतक-यांनी कृषी विभागाशी सल्ला मसलत करून त्यांनी निर्देशित केलेली पिके लावावी. त्यासाठी मग्रारोहयो अंतर्गत अनुदान उपलब्ध असल्यास ते अनुदान देण्यात येईल. सोबतच प्रति हेक्टरी रू. २५ ते ३० हजार अनुदान देण्यात येईल. दरवर्षी अनुदानात ५ टक्क्यांनी वाढ होईल, उत्पादित पिक लाभार्थी शेतकऱ्याला कुठेही विकण्याची मुभा असेल. शेतकरी व कृषी विभागाशी करार होईल. शेतकप्यांची मालको अबाधित राहील.

३. ज्यांना मग्रारोहयो अंतर्गत अनुदान मिळाले नाही, त्यांना प्रति हेक्टरी रु. ३० ते ३५ हजार अनुदान देण्यात येईल. दरवर्षी अनुदानात ५ टक्क्यांनी वाढ होईल. उत्पादित पिक लाभार्थी शेतक-याला कुठेही विकण्याची मुभा असेल. शेतकरी व कृषी विभागाशी करार होईल, शेतकऱ्यांची मालकी अबाधित राहोल.

४. शेती शासनाकडे करार करून दीर्घ मुदतीकरिता भाड्याने द्यावी. वनविभाग, FDCM मार्फत त्यात
वृक्षारोपण करेल, शेतकरी करारनामा करेल. प्रति हेक्टरी रू. ६५ हजार अनुदान देण्यात येईल. दरवर्षी अनुदानात ५ टक्क्यांनी वाढ होईल. उत्पादित पिकावर मालकी FDCM ची असेल. शेतक-यांची मालकी अबाधित राहोल.

५. ज्या शेतक-यांना स्वतःची शेती विकायची आहे, ती शेती शासन शेतकऱ्यांच्या विनंतीवर संपादन
करेल व LARR Act कलम २६ ते ३०/ १०८/२३ (क) च्यातरतुदीनुसार शेतक-यांना जी रक्कम योग्य वाटत असेल त्या रकमेत राज्य शासन स्वतःच्या नावाने हस्तांतरित करेल. त्याची लँडबैंक तयार करेल. शासनाला स्वतःच्या प्रकल्पाकरिता पर्यायी वन जमीनीसाठी या लैंडबँकेतून पर्यायी जमीन घेण्याची मुभा असेल. खाजगी संपादन यंत्रणेला या जमीनीचा खरेदी दर संपादन खर्च व त्यावरील PLR दराने व्याज शासनाला द्यावे लागेल.

६. उपरोक्त जमीनीवर शासनाने पाणलोट तपासून जल संधारणाची कामे करावी व शक्य तेथे तळे
किंवा तलाव निर्माण करावे. जमीन शेतक-याची असल्यास सहमतीने घ्यावी व त्यास रू. ६५ हजार भाडे द्यावे.

७. उपरोक्त भागातील शेतकरी समूहाने गट, FPO करून सामुहिकपणे एकत्रित येऊन किंवा PPP
करून खाजगी जंगल निर्माण करावे व त्यात निवास व पर्यटनाच्या सुविधा निर्माण करून निसर्ग पर्यटनातून स्वतःचा रोजगार निर्माण करावा. त्यासाठी पर्यटन विभागाकडून स्वतंत्र धोरण तयार करून शेतक-याला अर्थसहाय्य करण्यात येईल. सदर धोरण संलग्नित आहे.

****

## मुख्यमंत्री वन व पर्यावरण संवर्धन योजना, २०२५ वरील ...अभिप्राय...

### वि.त्र्यं.पत्की....

वन आणि वन्यजीव व्यवस्थापनाचे प्रमुख धोरण वन पर्यटनास चालना देणे ऐवजी जैव
विविधता वाढ,संरक्षण व संवर्धन असणे गरजेचे आहे.वाघांचे भ्रमण मार्ग हे मानवाच्या पर्यटनासाठी नसून वाघांचे संरक्षण मार्ग आहेत याचा विसर पडलेला दिसतो.

वनहक्क कायद्यानुसार वनांत हजारो छोट्या वन क्षेत्रात लाभधारकांना हक्क दिले आहेत,परंतु त्यांचे सीमांकन व चिन्हांकन झालेले नाही,ते सर्व प्राधान्याने होणे आवश्यक आहे.

हीच बाब कोकणातील खाजगी वने संपादन १९७५ च्या अधिनियम क्षेत्राबाबत प्रलंबीत असून,त्यांची पूर्तता होणेची गरज आहे. पुणे,अहिल्यानगर,नाशिक,धुळे व इतरत्र बिबट-मानव संघर्ष प्रचंड वाढीस लागलेला आहे.हा संघर्ष शमविण्यासाठी उपाय योजनाबाबत हे धोरण मौन बाळगून आहे.त्यावर भाष्य समाविष्ट करणे आवश्यक आहे. वनक्षेत्राचे बाहेरील वन्यजीव प्रगणेबाबत काय धोरण असावे यावर शासनाने व्यक्त व्हावे. वनविभागाचे प्रथम कार्य नैसर्गिक आणि मानव निर्मित वनांचे संरक्षण,संवर्धन,शास्त्रिय व्यवस्थापन करणे हे असून,पर्यटन नाही,हे ध्यानात ठेऊन नीती ठरवावी. वनहक्क कायदा अंमलबजावणी करतांना आदिवासी विभागाची अनाहूत लुडबुड बंद करुन नोडल यंत्रणा म्हणून वनविभागाची नियुक्ती करणे जरूरी आहे. कार्यआयोजनेचे पावित्र्य न राखता वनक्षेत्रानां उपचार दिले जात आहेत,याबाबत शासन शांत कां आहे हे समजत नाही. प्रसिध्द केलेल्या धोरणात्मक मसुद्यात अनेक फेरबदल करणे आवश्यक वाटते.

### अजित भोसले ......

१) राज्यातील वाढती लोकसंख्या व वाढती विविध विकास कामे यामुळे वन.व पर्यावरणवर.आघात झाला आहे , हे निरीक्षण प्रारंभीच मसुदा मध्ये नोंदविले आहे.
मसुदामधील, धोरण क्र. -१.
२) प्रस्तावीत धोरण क्र. १ नुसार वनांलगत व व्याघ्र भ्रमण क्षेत्राचे सर्वेक्षण जमीन वापर ( Land Use ) नुसार चिन्हांकण संयुक्तपणे वन, महसुल, कृषी व भुमापन कार्यालय करेल व याचा नकाशा पुढील अंमलबजावणी साठी तयार होईल.
अशाप्रकारच्या संयुक्त मोजणीचा पुर्वेतिहास व कालापव्यय पाहिल्यास प्रारंभिक कार्य वेळ घेईल.
३) विकेल ते पिकेल : वनांलगत व व्याघ्र भ्रमण क्षेत्रात " विकेल ते पिकेल " या घोषवाक्य आधारित शेतकरी पिके घेतील व.यासाठी कृषी विभाग कार्य करेल , असे अधोरेखीत केले आहे.विकेल ते पिकेल हे धोरण कृषी विभागाचे काही वर्षापुर्वीचे असुन प्रस्तावित " वनांलगत व व्याघ्र भ्रमण क्षेत्राचा

बहुतांशी भाग कृषी विभागाचे कार्यक्षेत्र आहे. त्यामुळे या विषयी कृषी विभागाशी वनविभाग कसा समन्वय साधणार ?

४) कृषी वानिकी व कँपा

वनांलगत व.व्याघ्र भर्मण क्षेत्रात नैसर्गिक आपत्ती सोशीक कृषी वानिकी (उदा. साग, महोगणी, चारा, बांबु, ई. ) ची शिफारस मसुद्यातील मुद्दा क्र. ७ मध्ये आहे.

याबाबत,
1) कृषी वानिकी बाबत तळमळ व.आस्था असलेले कै. एम.जी. गोगटे यांचे सारखे वनविभागात प्रादेशिक, राज्य स्तरावर शिरस्थ नेतृत्व आता आहे का ?
2) मनरेगा अंतर्गत निलगिरी, सुबाभुळ लागवड व पेपर मिल यामध्ये वन विभागाने * कृषी वानिकी इच्छुक शेतकरी समुह, पेपर मिल यांच्यामध्ये " दर्जेदार रोपेनिर्मिती, किफायतशीर लागवड तंत्रज्ञान, निष्कासन, हमीभाव याविषयी व्यवहार्य भुमिका निभावली नाही.
३) सद्यस्थितीत शेती मधील समस्या बहुअंगी असुन त्याचे आर्थिक, तांत्रिक, मानवी मुल्ये, शेतमजुरांवर प्रचलीत शासकीय धोरणांचा प्रभाव ( मोफत अथवा सब्सिडी ) इ. समस्यांचे आकलन, सर्वेक्षण करणायाची तयारी, मानसिकता वरिष्ठ वनाधिकार्यांची आहे का ?
४) बांबु क्लस्टर, सीएफसी, ईनक्युबेटर्स, स्टार्टअप यासारखे शेतकरी, कारागिरांना जोडणारे धोरण नव्या "बांबु इंडस्टिरियल पॉलिसी" अन्वये राज्याच्या उद्योग विभागाकडे गेला आहे.
राज्य बांबु धोरण २०१४, बांबु उच्चाधिकार समितीचा अहवाल, एमबीडीबी व बीआरटीसी तसेच एमबीपीएफ अशा म्हत्वपुर्ण संस्था व धोरण वन विभागाचे असतांना नव्या बांबु इंडस्ट्रियल पॉलिसी मध्ये वनविभागाच्या वरील पैकी एकाही संस्थेचा सहभाग नसणे , हि घटना बरेच काही सांगून जाते.

## माझी फोटोग्राफी :2

**-प्रमोद यादव, भाप्रसे (सेनि)**

तारीख 21 सप्टेंबर,2025. रविवार. काठमांडू ते लुकला असा विमानाचा प्रवास करायचा होता. तेनझिंग हिलरी एअरपोर्ट लुकला जायचे होते.आज आम्ही काठमांडू पेक्षा अधिक उंचीवर जाणार होतो. जवळपास 2900 मीटरवर काठमांडू विमानतळावर लवकर सहा वाजता तेथे पोहोचलो . कारण शनिवारी हवामान खराब असल्यामुळे विमानांची उड्डाणे रद्द झाली होती . विमानाचे तिकीट काढून आमचा प्रवास पुढे सुरू होणार होता .पण अगोदरच्या दिवशी हवामान खराब असल्यामुळे लुकला ते काठमांडू विमानांचे उड्डाण झाले नव्हते . अगोदरचे दिवशीचे जे प्रवासी होते त्यांना प्रथम जाण्याची संधी देण्यात आली होती. साधारण सहा तासांच्या प्रतीक्षेनंतर दुपारी आमचा एक वाजता विमानाचा नंबर लागला. लुकला एअरपोर्ट हा जगातील अत्यंत पाच धोकेदायक विमानतळ आहे त्यातील एक विमानतळ आहे. 17 सीटर विमानाने आमचा प्रवास सुरू झाला,
आकाशात विमानाने झेप घेतली आणि काठमांडू शहराचे विहंगम दृश्य दिसू लागले. हळूहळू विमान लुकलाच्या दिशेने जाऊ लागले. आणि मग हिमालयातील रांगांचा आणि नेपाळ देशाचा सर्व परिसर दिसू लागला. अत्यंत देखणा, हिरवागार, सौंदर्याने नटलेला तो प्रवास आणि पर्वत रांगा पाहून मनाला खरंच समाधान मिळाले . आमच्या विमानामध्ये मिहीर त्याचप्रमाणे तेथील लोकल गाईड भरत हा देखील होता. वीस पंचवीस मिनिटांचा प्रवास करून विमान लुकला एअरपोर्टच्या धावपट्टी वर पोहचले . विमानतळाची धावपट्टी पाहताच विमान पटकन विमानतळावर उतरले देखील.लागलीच तेथील हवामान चांगले असल्याने ते पाहता आले. विमानातून असणाऱ्या आमच्या बॅगा बाहेर घेऊन आम्ही विमानतळाच्या बाहेर पडलो.पण दरम्यान थोड्या वेळासाठी येणारे व जाणारे विमान परत कसे जाते हे पाहण्यासाठी तिथे थांबलो. म्हणजे विमान धावपट्टीवर आल्यानंतर नऊ सेकंदातच उडून ते काठमांडूच्या दिशेने गेले देखील.
हा विमान प्रवास तसा बेभरवशाचा आहे. हवामान हे नेहमीच खराब असल्यामुळे अनेक ट्रेकर्सला त्याचा फटका बसतो. लुकला ला जाण्यासाठी जर रस्त्याने जायचे असेल तर मागच्या एका टीमचा अनुभव त्यांना काठमांडू ते लुकला जाण्यासाठी जवळपास 23 तास लागले होते.पण तेच विमानाने फक्त वीस मिनिटात आपण तिथे पोहोचतो. विमानतळ पाहिला तेथील खोल पर्वतरांग,दऱ्या पाहिल्या. विमानतळ परिसर अत्यंत स्वच्छ व सुंदर होता. छोटाच परिसर पण अत्यंत फुलझाडांनी आणि फुलांच्या ताटव्याने मस्त सजवलेला होता. पुढील बाजूस चालतच आलो.त्यावेळी आमच्या बॅगा आम्ही भरतच्या ताब्यात दिल्या . आणि सोबत फक्त कॅमेरा बॅग घेऊन बाहेर पडलो.पुढच्या बाजूस आलो तर दोघांचा हसरा पुतळा पाहिला. एक होता एडमनड हिलरी आणि दुसरा होता शेर्पा तेनसिंग या दोघांचा हसतमुख असलेला हा खूप सुंदर असा पुतळा पाहिला. त्याचे फोटो मी आपल्याला याआधी टाकलेले आहेत. हा पुतळा पाहताना त्यांच्या चेहऱ्यावरील हसू आणि हातात असलेली स्टिक पाहताच आपण देखील एवरेस्ट ट्रेक पूर्ण करणार हा आत्मविश्वास मनात जोरदार तयार झाला.
छोटी कॅमेरा बॅग सोबत घेतली , चालू लागलो आणि काही फोटो काढले .लुकला मधून प्रवास करताना हिमालयाच्या डोंगर रांगा पाहत निघालो होतो . त्या ठिकाणी धूके दिसत होते. साधारण दुपारी 3.25 च्या सुमारास आमचा 14 किलोमीटर ट्रेक चालण्यासाठी सुरूवात झाली . वाटेत हिमालयाचे विहंगम असे दृश्य दिसत होते. बऱ्याच पर्वत शिखरावर धुके असल्यामुळे तेथे तेथे ढग आल्यामुळे काही दिसत नव्हते . असे मनोहरी दृश्य पहात ट्रेक वाटेने आम्ही निघालो होतो. आम्हाला आता पुढच्या मुक्कामाच्या ठिकाणी म्हणजे फाकडिंग पोहोचायचे होते . सुरुवातीचा उत्साह चांगला होता पण जसा प्रवास वाढू लागला. तसा अंधार पडू लागला आणि शेवटचा तीन चार किलोमीटर ट्रेक आम्ही मोबाईलच्या बॅटरी मध्येच पुरा केला. हा प्रवास करताना इतका सुंदर निसर्ग आणि स्वच्छ पाणी प्रचंड स्वच्छता ठेवलेली जाणवली. छोटी हॉटेल्स तेथील स्वच्छ घर त्या शेजारी असणारी छोटी फुलझाडे अत्यंत मनमोहक होते. कुठेही कचरा नाही हे पाहून मन सुखावले होते.
बऱ्याचदा निवडणूक ड्युटी निमित्त उत्तर भारत व दक्षिण भारत फिरलो आहे .निवडणुकीचा कालावधी जवळ जवळ दीड दोन महिन्याचा असल्यामुळे गाव ना गाव, मतदान केंद्र तपासावे लागत असे. साहजिकच स्वच्छता कशी आहे, काय आहे हे जाणवत असे . पुणे महानगरपालिकेमध्ये घनकचरा व्यवस्थापना काम करीत असताना कचरा विषय खूप जवळून अनुभवलेला आहे . आणि त्यामुळे जर व्यवस्थापन व्यवस्थित नसेल तर अस्वच्छतेचा कसा सामना नागरिकांना करावा लागतो हे पाहिलेले आहे. या स्वच्छतेला बहुतेक नागरिकच जबाबदार असतात पण त्यांचं प्रमाण असत फक्त दहा टक्के . आणि ते इतर 90 टक्के लोकांना कचऱ्याच्या स्वच्छतेपासून मुक्त करत नाहीत . उलट अस्वच्छतेकडे घेऊन जातात. अगदी दक्षिण भारतातील परिस्थिती म्हणजे केरळ कर्नाटक आंध्र

प्रदेश येथे बऱ्यापैकी स्वच्छ दिसते . विशाखापट्टणम शहर तेथील समुद्र किनारा देखील अत्यंत सुंदर दिसतो . पण हीच अवस्था गंगा नदीच्या पात्रात पाहिल्यानंतर किती स्वच्छता तिकडे असते यांना स्वच्छतेबद्दल काही माहीतच नाही असे जाणवते.

नेपाळमधील या ट्रेकवर चालताना जाताना सुंदर असे धबधबे होते. आणि सुंदर असे पाईन वृक्ष जे आकाशाला गवसणी घालत होते. घराशेजारी असणारे छोटे फुलांचे ताटवे मन आकर्षित करून घेत होते. त्यामुळे आनंद तर मिळतच होता आणि आमचा ट्रेकचा उत्साह वाढवत होता . पावणे सातच्या सुमाराला आम्ही फाकडिंग पोचलो.

आणि आमचा ट्रेक त्या दिवसासाठी तेथे थांबला . आमच्या ज्या मोठ्या बॅग होत्या त्या घेऊन तेथील आमचे मदतनीस आलेच होते. बॅग घेतली रूम पाहिली आणि मग सुस्कारा टाकला. हॉटेल मध्ये गरम कॉफीचा आस्वाद घेतला . पहिला दिवसाचा ट्रेक छान झाला होता . हिमालयाचं देखणं वैभव पाहीले होते . अजूनही खूप उंचीवर गेलो नसल्यामुळे कोणताही त्रास होत नव्हता . छान पैकी गप्पा मारत जेवण केलं,आणि उद्याचा नामचे बाजारचा ट्रेक चा विचार करत झोपी गेलो.

क्रमश .....











## आत्म्याचा मावळतीचा प्रवास - एक अवलोकन

**- ज्ञानदेव सातपुते**

आत्मा कधी मोठ्याने बोलत नाही. त्याची चाहूल कुजबुजेसारखी असते, वाऱ्याच्या मंद स्पर्शासारखी. जेव्हा जीवनाचा एखादा अध्याय आपली नैसर्गिक पूर्णता साधू लागतो, तेव्हा बदल बाहेर नाही, तर आतल्या गाभाऱ्यात होतो—जणू काही शांत जागेत आत्मा थोडा हलतो. अनेक परंपरा सांगतात, आत्मा शरीरापूर्वीच निघण्यासाठी तयार होतो; ही तयारी अंताची नाही, तर परतीच्या प्रवासाची असते—एक कैवल्यकारी शांती, एक निःशब्द समर्पण. हे संकेत निश्चित वेळ सांगत नाहीत, फक्त हे स्मरण करून देतात की आत्मा आता स्वतःला सावरतो आहे, कर्मनिर्मित वलये मिटवतो आहे, आणि प्रकाशाकडे झुकतो आहे.

जीवनाशी सौम्य नातं.......

सगळं शांत होतं—मन, वाद, राग. तो आता जीवनाशी झुंजत नाही, तर त्याला सामावून घेतो. पूर्वीच्या चिडचिडींचं आधिक्य विरतं, शब्दांत एक गोड शांतता उतरते. तो आता स्वतःचं स्पष्टीकरण देण्यात रस घेत नाही; क्षमा आणि स्वीकार सहज होतात. आत्मा जणू गुणगुणतो, “सगळं व्यवस्थित आहे... जाऊ दे.” ही शांती काही हरवल्याची नाही; ती पूर्णतेची आहे—एक गहिरं स्थैर्य, जणू आयुष्याने स्वतःच्या लाटा शांत केल्या आहेत.

भौतिक जगापासून हळूहळू अलिप्त होणं......

मग वस्तूंमधली आसक्ती कमी होते. मनसुबे, कपडे, प्रतिष्ठा—सगळं धूसर भासतं. “केंव्हातरी”वरचा विश्वास ओसरतो. आता त्यांच्या आयुष्यातील किंमती गोष्टी म्हणजे साधेपणा, जवळीक आणि निवांतपणा. काहीच धरून ठेवायचं नाही, फक्त हलकं व्हायचं. आत्मा आता विश्रांतीला प्राधान्य देतो, उपस्थितीला मान देतो, संचयनापेक्षा अर्थपूर्णतेला प्राधान्य देतो. गुरुत्व हळूहळू कमी होतं आणि आत्मा तरंगायला सुरुवात करतो.

आठवणी आणि आत्मस्वीकार.....

भूतकाळ पुन्हा डोळ्यांसमोर येतो—बालपणीचे क्षण, अपूर्ण नाती, केलेल्या चुका, मिळवलेले विजय. त्यांना आता सगळ्यांना आपुलकीने सामोरं जायचं असतं. ते क्षमा मागतात, माफ करतात, आत दडवलेल्या गोष्टी उलगडतात. हे भूतकाळात अडकणं नाही, तर आत्म्याचं संकलन आहे—जणू तो आपले सगळे रंग एकत्र जमवतोय, आत्म्याच्या आकाशातला शेवटचा चित्रपट पूर्ण करतोय.

नाती कमी, पण अधिक खोल........

आत्मा मग गोंगाटामधून बाहेर येतो. त्याला थोड्याच लोकांची संगत हवी असते—जिथे ऊब आहे, नजरेत सौजन्य आहे, आणि उपस्थितीत शांती आहे. लांब चर्चा, तर्क, आणि उपरी बोलणी हरवतात. राहतो तो फक्त अर्थपूर्ण सहवास. काही तास निवांत गप्पा, दोन शांत नजर-भेटी... आत्मा आता स्वतःचं शेवटचं वर्तुळ विणतो आहे—परीघापेक्षा जवळीक निवडत, गर्दीऐवजी निवांतपणाला मिठी मारत.

शरीराचा मंदावलेला ताल आणि अंतःप्रेरणेचं उघडं आकाश

खायला कमी लागतं, झोप वाढते किंवा कमी होते, हालचाली मंदावतात—हे थकव्याचं नाही, तर अंतर्गत सुलभतेचं लक्षण आहे.

आत्मा जणू सोंगट्या गोळा करून मोहरा मांडतो आहे. काही वेळा ते सहज बोलून जातात—"आता सगळं भरून आलंय", "मन शांत झालंय". त्या शब्दांच्या मागे भय नसतं, तर एक अद्भुत समर्पण दडलेलं असतं. शरीर आत्म्याच्या लयीशी जुळतं—हळू, स्थिर, स्वच्छंद.

निजधामाची आस

आणि शेवटच्या टप्प्यावर, एक ओढ जागते—घरी जायची. ती एखाद्या प्रकाशाच्या आठवणीसारखी असते, जिथं सर्व परिचित आत्मे उभे आहेत. कधी स्वप्नांत, कधी वाऱ्याच्या स्पर्शात तिचं स्मरण उमटतं. आत्मा जणू ओळखीच्या परतीच्या वाटेचं सुंदर निमंत्रण ऐकतो आहे—काळ, देह, आणि अंतराळाच्या पलिकडचं त्याचं मूळस्थान.

पवित्र शांततेतला शेवटचा श्वास......

आणि मग, सगळं हलकं होतं. शब्द कमी, पण भावना खोल. नजर उजळलेली, आणि व्यक्तित्वात एक गूढ तेज. आत्मा आता स्वतःचे धागे सैल करत जातो—ओळखीचे, कथांचे, देहाचे. उरतो तो केवळ सार—निर्मळ, विस्तारलेला, प्रकाशमय. हा शेवट नाही; ही परतफेरी आहे. त्या अनंत आकाशात विलीन होण्याची, जिथून तो कधीतरी या पृथ्वीवर आला होता—एक शांत, शुद्ध, आणि अनंत गृहप्रवेश.

## दृष्टिकोन .....

माणसं कमावण्याची जबरदस्त नशा असते वयाच्या एका टप्प्यापर्यंत. आपल्यापैकी अनेकांना ती असते. माणसं जोडणं ही छानच गोष्ट, अनेकांसाठी ती एक अभिमानाची बाब असते. जरूर असावी. चांगला स्वभाव आणि उत्तम चारित्र्य याच्या जोरावर अनेक माणसं जोडावीत, जपावीत.

पण हे करताना ही जपलेली माणसं आपल्यालाही 'जपत' आहेत ना हे बघणं फार महत्त्वाचं असतं. अनेकदा आपल्याला वाटून जातं, अरे बापरे. ही अमुक इतकी 'भारी' व्यक्ती आपल्यासोबत संपर्क ठेवून आहे. म्हणजे किती छान. त्या संपर्कामागे विशुद्ध भाव आहे ना, की पुढे जाऊन आपला 'स्टेपणी' म्हणून उपयोग केला जाणार आहे हे बघायला हवं. अशा अनेक अनुभवांतून आपण जात असतो, त्यामुळे 'हुरळून' जाणं टाळायला हवं.

तुम्हाला माणसं जोडावीशी वाटतात हा तुमचा चांगुलपणा असतो, पण त्याला तुमचा भावनिक कमकुवत पणा समजणारे खूप लोक असतात. त्यामुळे आपल्या चांगुलपणाचं इतकंही प्रदर्शन करू नये की तो संशयास्पद वाटू लागेल. अनेकदा एखादी व्यक्ती आपल्याला अत्यंत जवळची, जिवलग वाटत असते, आपली सुख दुःखं आपण तिला सांगत असतो. पण आपल्या वेदनांचा वापर पुढे ती आपलं मन:स्वास्थ्य उद्ध्वस्त करणारा दारुगोळा म्हणून देखील करू शकते. माणसांना इतकंही पोटाशी धरू नये की ते पुढे आपल्यावर लाडाने दुगाण्या झाडू लागतील. माणसं जोडताना कोणाला कोणत्या पायरीपर्यंत जवळ येऊ द्यावं हे ठरवून घ्यायला हवं. लायकी नसलेल्या एखाद्या व्यक्तीला फार जवळ केल्याचा अतोनात त्रास आयुष्यभर भोगावा लागू शकतो.

लोक तुम्हाला खांदा द्यायला नसतात बसलेले, अनेकदा तुम्ही रडण्यासाठी त्यांचा खांदा जवळ करता, हे त्यांना एंटरटेनिंग वाटू शकतं. दुःखावर बांधावीत अशी माणसं फार विरळा असतात. मन मोठं करून समोरच्याला मदत करणं, त्याचं चांगलं व्हावं यासाठी प्रयत्न करणारी भली माणसं जगात आहेत, नक्कीच आहेत. पण भसाभस माणसं जमवण्याच्या नादात दाण्यांपेक्षा बणग्याच जास्त गोळा होतात. त्यातली एखादी आयुष्यभर कुसळा सारखी टोचत राहते, असह्य वेदना देते.

'भारावून जाणं' ही एक फारच भाबडी गोष्ट आहे.कोणाच्या एवढ्या तेवढ्या गोष्टीने भारावून जाणारी माणसं आपल्यात असतात. फार जवळ जाऊन बघितलं की समोरच्या माणसाचे पायही मातीचे आहेत हे लक्षात येतं आणि अतोनात निराशा वाट्याला येते. माणसांतलं चांगलं ते जरूर वेचावं, त्याचं कौतुक करावं,जमल्यास आचरणात ही आणावं.

काही माणसं समोरून फार छान वाटतात, आदर्श वाटतात. आपण त्यांना आपलं मानत राहतो, फॉलो करत राहतो. आणि एका विवक्षित क्षणी कळतं, की काहीही घेणं देणं नसताना ही माणसं आपल्या सोबत किती खोटं, कृतक वागत होती, मागे डावपेच करत होती. मग जीव उबतो, त्या नात्याची शिसारी येऊ लागते. यावर पर्याय काय ? 'माणसांच्या फार जवळ न जाणे'. लांबून जे दिसतं त्यात आनंद मानावा. माणसं आपल्या समोर जे वागतात, बोलतात ते आणि तेवढंच खरं मानून पुढे निघावं, फार खोलात जाऊन गोष्टी जाणून घेण्याचा हट्ट करू नये. अपेक्षा भंग वाट्याला येतो.

माणसं कमावणं म्हणजे त्यांना आपल्या आयुष्यात हस्तक्षेप करण्याचे अधिकार देणं नव्हे. काही व्यक्ती आपले पणाच्या हक्काने काही गोष्टी सांगत असतात. त्या नम्रपणे ऐकून घेण्याची क्षमता ठेवावी.चार कटू गोष्टी ऐकाव्या लागल्या तरी त्यातून पुढे आपला भलंच होणार आहे हे आपण जाणून असावं. अर्थात आपलं खरोखरच भलं व्हावं म्हणून स्वतःचा वेळ देऊन आपला कान पकडणारं कोण आणि आपलं भलं पाहून पोटदुखी होणारे कोण यातला फरक आपल्याला ओळखता यायला हवा.

माणसं जरूर जोडावीत, जपावीत, एकमेकांच्या भावना आपल्याला दुखावू शकेल इतके अधिकार कुणाला देऊ नयेत. जगायला माणसं लागतातच, पण 'आतल्या' वर्तुळात कोणती माणसे घ्यायची आणि 'बाहेरच्या' वर्तुळात कोणती माणसं ठेवायची याचं गणित एकदा जमायला लागलं की सोपं होतं जगणं.

हेच जमणं आणि जमवणं महत्वाचं असतं.

## वाचक प्रतिक्रिया –
## सेवक वार्ता, नोव्हेंबर-२०२५

- माझी फोटोग्राफी, उत्कृष्ट लेख सहित उत्तम संकलन

  -संजय जगताप

- नोव्हेंबर २०२५ चा सेवक वार्ता अंक नेहमी प्रमाणे सुबक,विविध लेखांनी युक्त,सेवकची कार्ये दर्शविणारा आहे.सातत्याने दरमहा वेळेवर अंक प्रकाशीत केल्याबद्दल श्री.गवळी यांचे कौतुक व अभिनंदन.

  –व्ही. टी. पत्की

- सुंदर, वाचनीय अंक ! प्रमोद यादव यांची तिसरी इनिंग, पत्की साहेब यांच्या रेडिओ भाषणाचा वृत्तान्त ग्रेटच! रेडिओ भाषणाचा वृत्तान्त अधिक तपशीलवार असता तर अधिक चांगले. अमृत कल्प रेसिपी छान, प्रयोग करून पहायला हरकत नसावी! अभिनंदन गवळी साहेब !

  - आर.के. आडकर.

Very professionally edited Sevak warta Nov 25 issue. Happy to see Shri Patki coming once again on all india radio Mumbai explaining issues of forest land record mapping etc. We all wish him more such opportunities in sharing his knowledge. Shri Pramod ji IAS retd. adventure to mount Everest region and his skillful photography is so nicely depicted. Once again Shri Gawali ji has demonstrated his editing skills. Congratulations Keep it up.

- शि. अस्थाना

सुंदर अंक, सर्व लेख वाचनीय खास करून श्री प्रमोद यादव यांचा लेख वाचून हिमालयाची भमंति केल्यासारखं वाटलं. अभिनंदन

- एन. ए. पाटील

Very good issue of Sevak warta ! Congratulations Sambhaji! All the best for new issue!-डॉ. एस. एच. पाटील

Congratulations dear Sambhaji this time issue of Sevak Varta I excellent and Informative. Keep it up sir

– ब.द. वाघ

माहितीपूर्ण लेख. छपाई उत्तम. धन्यवाद श्री गवळीसाहेब

- विठ्ठल भावे

- सेवक वार्ताचा नवीन येणारा प्रत्येक अंक उच्च दर्जाचा असून नाविन्यपूर्ण माहितीने ओत:प्रेत आहे.

- पी.के. कुलकर्णी


केवळ खाजगी वितरणासाठी ... . . .

प्रकाशक - सेवक संघ, महाराष्ट्र, पुणे.

संपादन - एस. के. गवळी.

कार्यालय - वन ग्रंथालय, दुसरा मजला, वनभवन, भांबुर्डा वन विहार, गोखले नगर, पुणे - १६